प्रेसनोट दिनांक ११/०७/२०२२

## जासई उरण जि. रायगड येथील मंडळ अधिकारी यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| ठाणे दैनंदिनी नोंद कमांक | :- | खारघर पो.स्टे. ठाणे दैनंदिनी नोंद कमांक २७/२०२२- १५:५० वाजता दि. ११/०७/२०२२ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | श्री संदिप रमाकंत रोडे, वय ५७ वर्षे, मंडळ अधिकारी जासई उरण, रायगड (वर्ग ३) |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. २५,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू.२०,०००/- लाचेची मागणी. |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू.२०,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | यातील तक्रारदार यांचेकडे ते उरण येथे चालवीत असलेल्या एमटी कंटेनर यार्डवर कारवाई न करण्याकरीता लोकसेवक श्री. संदीप रोडे हे रू.२५,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक २७/०६/२०२२ रोजी अे.सी.बी. नवी मुंबई कार्यालयात तक्रार दिली होती.<br><br>दिनांक २७/०६/२०२२ रोजी शासकिय पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री. संदीप रोडे यांनी तक्रारदार यांचे एमटी कंटेनर यार्डवर कारवाई न करण्याकरीता रू. २५,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू.२०,०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br><br>दिनांक ११/०७/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान दिव्या रेसीडेन्सी इमारतीचे गेट समोर सेक्टर २७ खारघर नवी मुंबई येथे तक्रारदार यांचे गाडीमध्ये लोकसेवक श्री.संदीप रोडे यांनी तक्रारदार यांच्याकडून रू.२०,०००/- लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर लोकसेवक श्री. रोडे यांना १४:१२ वाजता रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

**मार्गदर्शन अधिकारी :-मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, पोलीस अधीक्षक, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

संपर्कपत्ता :- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेतस्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :- spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईनतक्रार
ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net
टोलफ्रीनं. :- १०६४
दुरध्वनी क्र. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२७८३३३४४
व्हॉटस्ॲप क्र. :- ९९३०९९७७००

(ज्योती देशमुख)
पोलीस उप अधीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई